लोकमत

# कोल्हापुरात उद्यापासून संत साहित्य संमेलन

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी उद्घाटक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर, संस्कृती मंत्रालय भारत सरकार आणि इंडसमून मीडिया प्रा.लि. यांच्या वतीने कोल्हापुरात उद्या व परवा (दि. ५ व ६ एप्रिल) पहिले विश्वात्मक संत साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आले आहे. या संमेलनाचे उद्घाटन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते होणार असून, संमेलनाध्यक्ष न्या. डॉ. मदन महाराज गोसावी आहेत.



कसबा बावडा येथील महासैनिक दरबार हॉल येथे होणाऱ्या या संत साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. सदानंद मोरे आहेत. मंगळवारी सकाळी अकरा वाजता होणाऱ्या या संमेलनास पालकमंत्री सतेज पाटील, ग्राम विकास मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत, आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील यड्रावकर, ज्येष्ठ कवियित्री डॉ. अरुणा ढेरे, लोककला अभ्यासक डॉ. प्रकाश खांडके उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाच्या निमित्ताने उद्घाटनादिवशी सकाळी साडेसात वाजता कसबा बावडा पॅव्हेलियन ग्राऊंड येथून महासैनिक दरबार हॉलपर्यंत ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दिंडीची सुरुवात प्रशासक कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते होईल. प्रा. डॉ. प्रकाश खांडके, रवी पाटील, जगन्नाथ पाटील, सोहन गोस्वामी, संकेत खडपुडे निमंत्रक असून, ग्रंथदिंडीची संकल्पना ज्येष्ठ कलावंत हेमसुवर्णा मिरजकर यांची आहे.

संमेलनात संत शिरोमणी पुरस्कार आळंदी येथील शांतिब्रह्म मारुती महाराज कुरेकर व विश्वात्मक संत शिरोमणी पुरस्कार हरिद्वार येथील महंत ऋषीश्वरानंद यांना देण्यात येणार आहे.

पुढारी

# डॉ. अर्जुन चव्हाण यांचा हिंदी भूषण पुरस्काराने गौरव



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांना विश्‍व हिंदी शोध संवर्धन अकादमी, वाराणशीतर्फे काशी विद्यापीठात हिंदी भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. चव्हाण यांनी हिंदी साहित्यात गीत, गझल व समीक्षा क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठ, वाराणशीचे कुलगुरू प्रा. राजाराम शुक्ल, माजी कुलगुरू प्रा. राममोहन पाठक, साहित्यकार वशिष्ठ अनुप, हिंदी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. शीतलाप्रसाद दुबे, उत्तर प्रदेश हिंदी संस्थानच्या डॉ. अमिता दुबे, हिरालाल मिश्र उपस्थित होते. समारंभात देशातील ४० निवडक साहित्यिकारांना सन्मानित केले.